
ॲनाचा नवा कोट

लेखिका: हॅरिएट झीफर्ट
चित्रे: अनिता लोबल



अ‍ॅनाचा नवा कोट

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन







हिवाळा नजिक आला होता. ॲनाला नव्या कोटची गरज होती. गेल्या अनेक हिवाळ्यांमध्ये ती जो निळा कोट घालायची तो आता जुना झाला होता. तो कोट तिला लहानसुद्धा होत होता.

गेल्या हिवाळ्यात ॲनाची आई म्हणाली, “युद्ध संपल्यावर आपण नव्या वस्तू खरेदी करू. तेव्हा तुला छानसा कोटसुद्धा घेऊ.”

पण युद्ध संपल्यावरही दुकाने रिकामीच दिसत होती. तिथे ना कोट होते, ना अन्नधान्य. खरेदी करायला लोकांकडे पैसाच नव्हता.







ॲनाची आई काळजीत पडली, ॲनासाठी नवा कोट कुठून आणायचा? काही विचार करून ती म्हणाली, “ॲना, माझ्याकडे पैसे नाहीत, पण आजोबांचं एक सोन्याचं घड्याळ आणि काही वस्तू आहेत. त्या वापरून नवा कोट करता येईल. पण त्याआधी मला लोकर हवीय. उद्या आपण एका शेतकऱ्याला भेटू. त्याच्याकडून लोकर मिळते का, ते पाहू.”





पुढच्या दिवशी ॲना आणि तिची आई जवळच्या एका शेतावर गेले. ॲनाची आई शेतकऱ्याला म्हणाली, “ॲनाला नव्या कोटची गरज आहे. माझ्याकडे कोट घ्यायला पैसे नाहीत. तुम्ही मला तुमच्या मेंढरांची लोकर दिलीत तर त्यापासून कोट बनवता येईल. त्याबदल्यात मी तुम्हाला हे सोन्याचं घड्याळ देईन.”

शेतकरी म्हणाला, “व्वा! छान कल्पना आहे. पण पानगळ सुरू होऊ दे. मेंढ्यांच्या अंगावरची लोकर वाढू दे. ती पुरेशी वाढल्यावर मी ती कातरून ठेवेन. तेव्हा मी तुम्हाला सोन्याच्या घड्याळाच्या बदल्यात लोकर देईन.”





मग ॲना दर रविवारी आईसोबत शेतावर जाऊन मेंढ्यांना भेटू लागली आणि त्यांना विचारू लागली, “तुमच्या अंगावरची लोकर वाढतेय का?” उत्तरादाखल मेंढ्या, “बेंऽऽऽऽ,” असा आवाज काढत. मग ॲना मेंढ्यांना ताजा चारा खायला देई, त्यांना आलिंगन देई. ख्रिसमसच्या काळात ॲनाने मेंढ्यांसाठी कागदी हार आणि सफरचंद आणले. तिने त्यांच्यासाठी ख्रिसमसचे गीतसुद्धा गायले.





मग काही दिवसांनी शेतकऱ्याने मेंढ्यांच्या अंगावरची लोकर कातरली.
“त्यांना दुखतं का?” ॲनाने विचारले.
“नाही ॲना, केस कापल्यावर कसं वाटतं, तसंच असतं हे,” शेतकरी म्हणाला.
शेतकऱ्याने ॲनाला लोकर कशी पिंजायची, ते दाखवले, “आपण केसातल्या बटा कशा सोडवतो, तशाच सोडवायच्या याच्या गाठी.”
मग त्याने ॲनाच्या आईला लोकराने भरलेली मोठी पिशवी दिली. ॲनाच्या आईने शेतकऱ्याला सोन्याचे घड्याळ दिले.





ॲना आणि तिची आई लोकर घेऊन एका वृद्ध स्त्रीकडे गेले. तिच्याकडे सूत कातायचा चरखा होता.

“ॲनासाठी कोट शिवायचाय. माझ्याकडे पैसे नाहीत. तुम्ही या लोकरीचं सूत काढून दिलंत तर मी तुम्हाला हा दिवा देईन,” ॲनाची आई तिला म्हणाली.


वृद्ध स्त्री म्हणाली, “छान! मला घरात एक दिवा हवाच होता. पण मी लगेच सूत कातून देऊ शकत नाही. माझं वय झालंय आता, बोटंसुद्धा ताठर झालीयत. चेरी पिकायला लागल्यावर ये. मी सूत कातून ठेवलेलं असेल.”


उन्हाळ्याचे आगमन झाल्यावर ॲना आणि तिची आई वृद्ध स्त्रीकडे परत गेले. ॲनाच्या आईने तिला दिवा दिला आणि तिच्याकडून कातलेले सूत घेतले. वृद्ध स्त्रीने ॲनाला लालभडक रसाळ चेरी भेट दिली.





“ॲना, तुला कोणत्या रंगाचा कोट हवाय?” आईने विचारले.
“लाल रंगाचा,” ॲना म्हणाली.
“मग आपण थोडी लाल बोरं तोडून आणू. त्यांच्यापासून छान लाल रंग बनतो,” आई म्हणाली.
ॲना आणि तिची आई जंगलात गेले आणि त्यांनी पिकलेली लाल मोठी बोरं गोळा केली.





ॲना आणि तिच्या आईने भांड्यात पाणी उकळत ठेवले आणि त्यात लाल बोरं टाकली. त्या लाल रंगाच्या पाण्यात ॲनाच्या आईने लोकरीचे धागे बुडवले.



मग त्यांनी लाल झालेले लोकरीचे धागे कपडे वाळवायच्या दोरीवर सुकवत ठेवले. धागे सुकल्यावर ॲना आणि तिच्या आईने त्यांचे चेंडूसारखे गोळे केले.





ॲना आणि तिची आई लोकरीचे गोळे घेऊन विणकर स्त्रीकडे गेल्या.

“ॲनाला कोट शिवायचाय. माझ्याकडे पैसे नाहीत. तुम्ही या लोकरीपासून कापड विणून दिलेत तर मी तुम्हाला हा किमती हार देईन,” ॲनाची आई विणकर स्त्रीला म्हणाली. विणकर स्त्री म्हणाली, “अरे व्वा! मला असा हार हवाच होता. दोन आठवड्यांनी ये. तोवर मी कापड विणून ठेवते.”

ॲना आणि तिची आई पुन्हा आल्या तेव्हा विणकर स्त्रीने त्यांना विणून तयार असलेले लाल लोकरीचे कापड दिले. त्याबदल्यात ॲनाच्या आईने स्त्रीला हार दिला.






पुढच्या दिवशी ॲना आणि तिची आई टेलरकडे गेल्या.
“थंडीसाठी ॲनाला कोट शिवायचाय. माझ्याकडे पैसे नाहीत. पण तुम्ही या लोकरीच्या कापडाचा कोट शिवून दिलात तर मी तुम्हाला ही चिनीमातीची किटली देईन,” ॲनाची आई म्हणाली.
टेलर म्हणाला, “व्वा! छान आहे किटली. मी ॲनासाठी कोट जरूर शिवेन. पण आधी मला ॲनाची मापं घेऊ द्या.”
टेलरने ॲनाच्या खांद्याचे माप घेतले. तिच्या हाताचे माप घेतले. तिच्या मानेच्या मागच्या भागापासून गुडघ्यापर्यंतचे माप घेतले. मग तो म्हणाला, “पुढच्या आठवड्यापर्यंत कोट शिवून तयार ठेवतो.”






टेलरने लोकरीचे कापड हव्या त्या आकारात कापून घेतले. त्यावर शिवणकाम करून टाके घातले. आठवडाभर तो नेटाने कोटाचे काम करत राहिला. काम संपल्यावर, त्याने कोटाच्या रंगाशी जुळतील अशी सहा बटणे कोटावर शिवून टाकली. येता-जाता लोकांची नजर कोटावर पडावी यासाठी अभिमानाने त्याने कोट खिडकीवर टांगून ठेवला.





आठवडाभराने ॲना आणि तिची आई टेलरच्या दुकानात आल्या. ॲनाने कोट अंगात घातला. आणि आरशासमोर वळून-वळून पाहू लागली. कोट अंगावर व्यवस्थित बसला होता. ॲनाने टेलरकाकांचे आभार मानले. तिच्या आईनेही त्यांचे आभार मानले आणि त्यांना चिनी मातीची किटली दिली.





घरी परतताना ॲना प्रत्येक दुकानाच्या खिडकीसमोर थांबू लागली आणि खिडकीच्या काचेत आपले प्रतिंबिंब निरखून बघू लागली. घरी पोहोचल्यावर तिची आई म्हणाली, “ख्रिसमस तोंडावर आलाय. यावर्षी आपण घरी छोटीशी पार्टी करू.”

ॲना म्हणाली, “आई, आपण हा कोट बनवायला ज्यांची ज्यांची मदत झाली त्या सगळ्यांना पार्टीला बोलवूया का?”

“हो, का नाही!” आई म्हणाली. “मी नेहमीसारखाच छान ख्रिसमस केकसुद्धा बनवेन.” ॲनाने तिच्या आईला मिठी मारली.



ख्रिसमसच्या आदल्या सायंकाळी लोकर देणारा शेतकरी, सूत कातून देणारी वृद्ध स्त्री, कापड विणून देणारी विणकर स्त्री आणि कापडाचा कोट बनवून देणारा टेलर हे सारे अॅनाच्या घरी आले. अॅना त्या कोटमध्ये खूप गोड दिसते, असे म्हणून सर्वांनी तिचे कौतुक केले. अॅनाच्या आईने बनवलेला केक खूपच चविष्ट होता. गेल्या कित्येक वर्षांत असा छान ख्रिसमस साजरा केला नाही, असेच सर्वांना वाटले.







ख्रिसमसच्या दिवशी ॲना मेंढरांना भेटायला गेली. ती त्यांना म्हणाली, “तुम्ही सगळ्यांनी मला लोकर दिल्याबद्दल आभार. तुम्हाला माझा हा नवा कोट आवडला का?”

चेहऱ्यावर आनंद आणल्यागत मेंढ्या उत्तरल्या, “बेंऽऽऽऽ!”

समाप्त